# MARATHI

## Paper I

## ( LITERATURE )

Time allowed : **Three** Hours

Maximum Marks : **250**

---

### Question Paper Specific Instructions

***Please read each of the following instructions carefully before attempting questions :***

*There are **EIGHT** questions divided in two **SECTIONS**.*

*Candidate has to attempt **FIVE** questions in all.*

*Questions no. **1** and **5** are compulsory and out of the remaining, **THREE** are to be attempted choosing at least **ONE** from each section.*

*The number of marks carried by a question / part is indicated against it.*

*Answers must be written in **MARATHI**.*

*Word limit in questions, wherever specified, should be adhered to.*

*Attempts of questions shall be counted in chronological order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the answer book must be clearly struck off.*

---

### SECTION A

**Q1.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे शंभर पन्नास (150) शब्दांत लिहा : *10×5=50*

(a) ‘भाषा ही सानुक्रम ध्वनिरचनांच्या संकेतीकरणावर आधारलेली संज्ञापन प्रणाली आहे’ या विधानाचे स्पष्टीकरण करा. *10*

(b) प्रमाणभाषा आणि बोलीभाषा यांचे महत्त्व भिन्न-भिन्न प्रकारचे कसे आहे, ते थोडक्यात सांगा. *10*

(c) वऱ्हाडी बोलीचा थोडक्यात परिचय करून द्या. *10*

(d) शब्दांच्या जाती सांगून सर्वनाम, विशेषण, आणि क्रियाविशेषण यांची सोदाहरण माहिती द्या. *10*

(e) लोककथांमधून घडणारे सामाजिक दर्शन हे कोणकोणत्या दृष्टीने महत्त्वाचे असते ? *10*

**Q2.** (a) नोम चॉम्स्की या भाषावैज्ञानिकाच्या दृष्टीने "'निर्मितिशीलता' हा मानवी भाषा व्यवहाराचा सर्वात महत्त्वाचा गुणधर्म" कसा आहे ते सांगून, भाषानिर्मितीच्या वेगवेगळ्या उपपत्ती कोणत्या ते सांगा. 20

(b) व्यवहारभाषा, साहित्यभाषा आणि शास्त्रभाषा यांची माहिती द्या. 15

(c) अहिराणी या बोलीभाषेसंबंधी असलेल्या वादाचे स्वरूप स्पष्ट करा. 15

**Q3.** (a) तेराव्या शतकातील मराठी भाषेची वैशिष्ट्ये संतकाव्याच्या आधारे स्पष्ट करा. 20

(b) मराठीतील विभक्तींची माहिती देऊन त्यांचे कारकार्थ कोणते ते लिहा. 15

(c) गण, गौळण, आणि वग यांमधून तमाशा हे लोकनाट्य कसे साकार केले जाते, ते विशद करा. 15

**Q4.** (a) मानवी भाषेची द्विस्तरीय रचना व यादृच्छिकता म्हणजे काय ? त्यांचे विविध फायदे सोदाहरण स्पष्ट करा. 20

(b) जात्यावरील ओव्यांमधून स्त्री-जीवनातील भावबंधांचे स्वरूप कसे व्यक्त होते, ते स्पष्ट करा. 15

(c) व्रतांच्या कहाण्यांमधून घडणाऱ्या संस्कृतिदर्शनाची माहिती द्या. 15

## SECTION B

**Q5.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे शंभर पन्नास (150) शब्दांत लिहा : *10×5=50*

(a) वारकरी संप्रदायाने दर्शविलेला भक्तीचा मार्ग हा सामाजिक समतेकडे वाटचाल करणारा कसा होता, ते थोडक्यात स्पष्ट करा. *10*

(b) 'बखरी म्हणजे इतिहास आणि कल्पकता यांचे मिश्रण असल्यामुळे त्यांतील ऐतिहासिकता पारखून घ्यावी लागते' या विधानाचे स्पष्टीकरण करा. *10*

(c) केशवसुतांना आधुनिक कवितेचे जनक असे का म्हटले गेले, ते सांगा. *10*

(d) दलित कवितेमधून व्यक्त झालेल्या दलितांच्या वेदनांचे स्वरूप स्पष्ट करा. *10*

(e) सामाजिक बांधिलकी हे साहित्याच्या श्रेष्ठतेचे गमक मानता येईल का ? *10*

**Q6.** (a) 'लीळाचरित्र' या ग्रंथातून चक्रधरांच्या व्यक्तिमत्त्वाचे कोणकोणते पैलू दिसून येतात, ते स्पष्ट करा. *20*

(b) संत एकनाथांच्या काव्यकर्तृत्वातील विविधतेचा थोडक्यात परिचय करून द्या. *15*

(c) 'पोवाडा' या शाहिरी काव्याची थोडक्यात माहिती सांगा. *15*

**Q7.** (a) रविकिरण मंडळाच्या काव्याची पृथगात्म वैशिष्ट्ये कोणती ते सांगा. *20*

(b) व्यंकटेश माडगूळकर यांचे मराठी ग्रामीण साहित्यातील योगदान विशद करा. *15*

(c) संगीत नाटकांमधील संगीत हे नाट्यविषयाला पूरक किंवा मारक असते का ते सोदाहरण सांगा. *15*

**Q8.** (a) आधुनिक साहित्याची समीक्षा करताना संस्कृत साहित्यशास्त्राचा उपयोग कितपत होऊ शकेल, त्याची चर्चा करा. *20*

(b) साहित्याचे प्रयोजन हे साहित्याच्या स्वरूपावरून ठरविणे योग्य आहे की स्वतंत्रपणे ठरविणे योग्य आहे, याची शहानिशा करा. *15*

(c) स्त्रीवादी दृष्टिकोनातून सानिया यांच्या कथासाहित्याचे मूल्यमापन करा. *15*